DB स्टार

**Saturday 5/7/2025**

# श्रीयश महाविद्यालय • २५ विद्यार्थ्यांची मुलाखतीतून विविध कंपन्यांसाठी निवड



**छत्रपती संभाजीनगर** | श्रीयश प्रतिष्ठानच्या अभियांत्रिकी व फार्मसी महाविद्यालयातील एकूण २५ विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयातील सिव्हिल इंजिनिअरिंगच्या दोन विद्यार्थ्यांची प्रोजेक्ट इंजिनिअर म्हणून निवड झाली आहे. तर ईटीसी विभागातून एक तसेच इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या चार विद्यार्थ्यांची प्रोजेक्ट मॅनेजर पदासाठी निवड झाली. महाराष्ट्र राज्य इलेक्ट्रिक महावितरण कंपनीमध्ये इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्यांची निवड झाली असून शासकीय नोकरीमध्ये संधी मिळणे मोठे यश मानले जात आहे.

पुण्य नगरी

**Friday 4/6/25**

# श्रीयश इंजिनिअरिंगच्या १२० विद्यार्थ्यांची इंटर्नशिपसाठी निवड



पेड इंटर्नशिपसाठी निवड झालेले श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी महाविद्यालयाचे विद्यार्थी.

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक्स शाखेतील १२० विद्यार्थ्यांची निवड धूत इलेक्ट्रिकल सिस्टीम्स प्रायव्हेट लिमिटेड, शेंद्रा, धूत ट्रान्समिशन, सुनील इंडस्ट्रीज लि. आणि बिजी लीन लिमिटेड येथे पेड इंटर्नशिपसाठी झाली आहे.

विद्यार्थ्यांनी धूत इलेक्ट्रिकल सिस्टीम्स येथे इंटर्नशिप सुरू केली असून बाकी कंपन्यांमधे लवकरच सुरू होईल. विद्यार्थ्यांना त्यांच्या नियमित अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून ही तीन महिन्यांची इंटर्नशिप पूर्ण करावी लागते.

या कालावधीत विद्यार्थी प्रत्यक्ष औद्योगिक वातावरणात कार्य करून तांत्रिक कौशल्य, औद्योगिक शिस्त आणि व्यावसायिक अनुभव प्राप्त करणार आहेत.या उल्लेखनीय यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे यांनी विद्यार्थी, कॉलेजचे प्राचार्य, सेंट्रल टीपीसीचे प्रमुख, सर्व विभागप्रमुख व संबंधित शिक्षकवृंदांचे कौतुक केले आहे.

लोकमत

**Monday 2/6/25**

# श्रीयश प्रतिष्ठानच्या पॉलिटेक्निक कॉलेजच्या 143 विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांमध्ये नेमणूक



कंपनीचे अधिकारी, महाविद्यालयाचे प्राध्यापकवृंद आणि निवड झालेले विद्यार्थी

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश प्रतिष्ठानच्या पॉलिटेक्निक कॉलेज, छत्रपती संभाजीनगर येथे अलीकडेच आयोजित करण्यात आलेल्या कँपस ड्राइव्हमध्ये एकूण १४३ विद्यार्थ्यांची विविध नामवंत कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये बजाज ऑटो, एंड्युरन्स टेक्नॉलॉजीज, ग्रीव्ह्स कॉटन लिमिटेड, भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल (जालना), जिओस्पेक्ट्रा जिओटेक्निकल प्रा. लि., आणि हेडगेवार हॉस्पिटल लि. सारख्या प्रतिष्ठित कंपन्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांच्या इंटर्नशिपचा अनुभव आणि प्रशिक्षण काळात मिळालेले मार्गदर्शन त्यांच्या निवडीस कारणीभूत ठरले. ही संपूर्ण प्रक्रिया श्रीयशच्या सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलमार्फत पार पडली. महाविद्यालयाचे कॅम्पुटर, डेटा सायन्स आणि आर्टीफिसिअल इंटेलिजन्स शाखेचे विद्यार्थी प्रोजेक्ट वर काम करत असून त्यांनंतर ते देखील नौकरीत रुजू होणार आहेत. श्रीयश प्रतिष्ठान आपल्या विद्यार्थ्यांना नौकरी देण्यास कटिबद्ध असून दरवषी अंशी टक्क्यांपेक्षा जास्त विदयार्थ्यांची नेमणूक होत आहे. काही नामांकित कंपन्यामध्ये नेमणूक झालेले विद्यार्थी खालील प्रमाणे आहेत.

| शाखा/ कंपनी | बजाज ऑटो | एंड्युरन्स लि. | भाग्यलक्ष्मी रोलिंग | ग्रीव्ह्स कॉटन | हेडगेवार हॉस्पिटल | जिओस्पेक्ट्रा जिओटेक्निकल लि. | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इलेक्ट्रिकल | १९ | २० | ०३ | १५ | - | - | ५७ |
| इलेक्ट्रॉनिक्स | १५ | ०९ | ०३ | ०८ | - | - | ३५ |
| मेकॅनिकल | ०६ | १० | ०६ | २२ | - | - | ४४ |
| सिव्हिल | - | - | - | - | ०४ | ०३ | ०७ |
| एकूण | ४० | ३९ | १२ | ४५ | ०४ | ०३ | १४३ |

या उल्लेखनीय यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे यांनी नेमणूक झालेले विद्यार्थी, कॉलेजचे प्राचार्य, सेंट्रल टीपीसीचे प्रमुख, सर्व विभागप्रमुख व संबंधित शिक्षकवृंदांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे कॉलेजच्या गुणवत्तापूर्ण शिक्षण प्रणालीवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. (RCI)

**Shreeyash Pratishthan**

Polytechnic | Engineering | Pharmacy | BAMS | MBA| BCA

लोकमत

Wednesday 16/4/2025

# श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या १६ विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखतीत निवड



परिसर मुलाखतीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत श्रीयशचे पदाधिकारी.

छत्रपती संभाजीनगर : श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आणि पॉलिटेक्निक कॉलेज, यांच्या सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या वतीने दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात होते.

या मुलाखतींसाठी हेडगेवार हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर व भाग्यलक्ष्मी रोलिंग मिल, जालना या प्रतिष्ठित कंपन्यांनी सहभाग घेतला होता. या कॅम्पस ड्राइव्हमध्ये १६ विद्यार्थ्यांची अभियंता पदासाठी निवड झाली आहे.

याचसोबत श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मसिरा तांबोळी (कॉम्प्युटर), मुकुंदराज गित्ते (इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड कॉम्प्युटर), सोहेल शेख (मेकॅनिकल), तसेच श्रीयश कॉलेज ऑफ फार्मसीच्या रोहिणी खुडे व प्रिया उणे हे विद्यार्थी गेट परीक्षेत पात्र ठरले आहेत.

श्रीयश प्रतिष्ठानचे आदरणीय अध्यक्ष मा. बसवराज मंगरुळे यांनी प्राचार्य, विभागप्रमुख, प्लेसमेंटप्रमुख आणि सर्व निवड झालेल्या व गेट परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले. (RCI)

## गेट परीक्षेत ठरले पाच विद्यार्थी पात्र



मसिरा तांबोळी (कॉम्प्युटर)



मुकुंदराज गित्ते (इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅण्ड कॉम्प्युटर)



सोहेल शेख (मेकॅनिकल)



रोहिणी खुडे (फार्मसी)



प्रिया उणे (फार्मसी)

सकाळ

Thursday 13/3/2025

# श्रीयश प्रतिष्ठानमधील ४३ विद्यार्थ्यांची निवड

सातारा, ता. १२ : श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश टेक्निकल कॅम्पसमधील ४३ विद्यार्थ्यांची बजाज ऑटो, महापारेषण आणि एम. जे. बायोफार्ममध्ये निवड झाली. श्रीयश प्रतिष्ठानच्या सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलद्वारे बजाज ऑटो लिमिटेडच्या डिप्लोमा ट्रेनी इंजिनिअर्स पदासाठी कॅम्पस मुलाखती घेण्यात आल्या.

यावेळी सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. अनिल पालवे यांनी कंपनीच्या अपेक्षा स्पष्ट केल्या, तर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा. एस. एस. खंडागळे यांनी बजाजमधील करिअरबद्दल माहिती दिली. श्रीयश अभियांत्रिकीच्या इलेक्ट्रिकल शाखेतील नीता चाबुकस्वार आणि स्वप्निल घुले यांची महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनीत सहायक अभियंता पदावर निवड झाली आहे. त्याचबरोबर श्रीयश फार्मसीच्या एम. फार्म. अभ्यासक्रमाचा विद्यार्थी अजय नेहुल याची एम. जे. बायोफार्म प्रा. लि., पुणे येथे ज्युनिअर एक्झिक्युटिव्ह पदावर निवड झाली आहे. या यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

मराठवाडा साथी

Wednesday 12/3/2025

# श्रीयश प्रतिष्ठानच्या ४३ विद्यार्थ्यांची बजाज ऑटो, महापारेषण, एम.जे.बायोफार्ममध्ये निवड



संभाजीनगर : श्रीयश प्रतिष्ठानच्या सेंट्रल ट्रैनिंग अँड प्लेसमेंट सेलद्वारे बजाज ऑटो लिमिटेडच्या डिप्लोमा ट्रेनी इंजिनीअर्स पदासाठी कॅम्पस मुलाखतींचे आयोजन करण्यात आले. कंपनीद्वारे प्री-प्लेसमेंट प्रेझेंटेशन व मुलाखती घेण्यात आल्या. ह्यावेळी सेंट्रल ट्रैनिंग अँड प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. अनिल पालवे यांनी कंपनीच्या अपेक्षा स्पष्ट केल्या, तर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा. एस. एस. खंडागळे यांनी बजाजमधील करिअर बद्दल माहिती दिली. या ड्राइव्हमध्ये तब्बल ४० विद्यार्थ्यांची निवड झाली.तसेच श्रीयश अभियांत्रिकीच्या इलेक्ट्रिकल शाखेतील नीता चाबुकस्वार आणि स्वप्नील घुले यांची महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनीत सहाय्यक अभियंता पदावर निवड झाली आहे. दोन्ही विद्यार्थ्यांनी कंपनीच्या लेखी परीक्षेत उत्तीर्ण होऊन ही उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याचबरोबर श्रीयश फार्मसीच्या एम. फार्म. अभ्यासक्रमाचा विद्यार्थी अजय नेहुल ह्यांची एम. जे. बायोफार्म प्रा. लि., पुणे येथे ज्युनियर एक्झिक्युटिव्ह पदावर निवड झाली आहे.या गौरवपूर्ण यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. बसवराज मंगरुळे यांनी प्राचार्य, प्लेसमेंट सेल प्रमुख, सर्व विभागप्रमुख आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

लोकमत

Wednesday 12/3/2025

# श्रीयश प्रतिष्ठानच्या श्रीयश टेक्निकल कॅम्पसमधील

# ४३ विद्यार्थ्यांची बजाज ऑटो, महापारेषण आणि एम.जे. बायोफार्ममध्ये निवड




छत्रपती संभाजीनगर : दिनांक : ११/०३/२०२५ श्रीयश प्रतिष्ठानच्या सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलद्वारे बजाज ऑटो लिमिटेडच्या डिप्लोमा ट्रेनी इंजिनीअर्स पदासाठी कॅम्पस मुलाखतींचे आयोजन करण्यात आले.

कंपनीद्वारे प्री-प्लेसमेंट प्रेझेंटेशन व मुलाखती घेण्यात आल्या. यावेळी सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. अनिल पालवे यांनी कंपनीच्या अपेक्षा स्पष्ट केल्या, तर पॉलिटेक्निकचे प्राचार्य प्रा. एस.एस. खंडागळे यांनी बजाजमधील करिअरबद्दल माहिती दिली. या ड्राइव्हमध्ये तब्बल ४० विद्यार्थ्यांची निवड झाली.

तसेच श्रीयश अभियांत्रिकीच्या इलेक्ट्रिकल शाखेतील नीता चाबुकस्वार आणि स्वप्नील घुले यांची महाराष्ट्र राज्य वीज पारेषण कंपनीत सहायक अभियंता पदावर निवड झाली आहे. दोन्ही विद्यार्थ्यांनी कंपनीच्या लेखी परीक्षेत उत्तीर्ण होऊन ही उल्लेखनीय कामगिरी


स्वप्नील घुगे


नीता चाबुकस्वार

केली आहे. त्याचबरोबर श्रीयश फार्मसीच्या एम. फार्म. अभ्यासक्रमाचा विद्यार्थी अजय


अजय नेहूल

नेहूलची एम. जे. बायोफार्म प्रा. लि., पुणे येथे ज्युनिअर एक्झिक्युटिव्ह पदावर निवड झाली आहे.

या गौरवपूर्ण यशाबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. बसवराज मंगरुळे यांनी प्राचार्य, प्लेसमेंट सेलप्रमुख, सर्व विभागप्रमुख आणि यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

(RCI)

LOKMAT TIMES

**Thursday 4/3/2025**

# 43 'Shreeyash' students selected

LOKMAT NEWS NETWORK
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

A total of 43 students of Shreeyash Pratishthan's Shreeyash Technical Campus selected in three top companies recently. Colleges Central Training and Placement Cell conducted campus interviews for the position of Diploma Trainee Engineer at Bajaj Auto Limited.

The company conducted pre-placement presentations and interviews as part of the recruitment process. Head of the Placement Cell Anil Palve provided insights into the company's expectations, while Polytechnic Principal S S Khandagale shared information about career opportunities at Bajaj Auto.

A total of 40 students secured placements in the company.



Students of Shreeyash Pratishthan's Shreeyash Technical Campus secured jobs in top companies recently. Selected students can be seen along with college staff.

Similarly, Neeta Chabukswar and Swapnil Ghule from the Electrical Engineering branch of the College were selected as Assistant Engineers at Maharashtra State Electricity Transmission Company (Mahatransco).

Furthermore, Ajay Nehul, a student of the M. Pharm program was selected as a Junior Executive at M J Bio-Pharm Pvt Ltd, Pune. President of Shreeyash Pratishthan, Basavraj Mangrule, extended heartfelt congratulations to college staff and students.

Thursday 23/1/2025

# श्रीयश टेक्निकल कॅम्पसच्या सात विद्यार्थ्यांची परिसर मुलाखतीमध्ये निवड



परिसर मुलाखतीमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांसोबत श्रीयशचे पदाधिकारी.

**छत्रपती संभाजीनगर** : २१ जानेवारी २०२५ श्रीयश प्रतिष्ठानच्या सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलद्वारे आयोजित कॅम्पस ड्राइव्हमध्ये एकूण सात विद्यार्थ्यांची यशस्वी निवड झाली आहे. यामध्ये विविध कंपन्यांनी निवड केली.

श्रीयश अभियांत्रिकीच्या इलेक्ट्रिकल विभागातील रोहन बोराडे आणि रितेश राठोड या दोन विद्यार्थ्यांची इन्फिसोल एनर्जी या कंपनीत सोलार डेटा ॲनालिस्ट म्हणून निवड झाली. त्यांना वार्षिक अडीच लाख रुपयांचे पॅकेज मिळाले.

ॲजाइल टेक्नॉलॉजी सोल्युशन्स या कंपनीने टॅलेंट ॲक्विझिशन स्पेशालिस्ट म्हणून तीन विद्यार्थ्यांची निवड केली आहे. यात बी.टेक.ची दिव्या लहाने आणि एमबीएचे शशांक पगारे व अंकुर राठोड यांचा समावेश आहे. त्याना ३ लाख रुपये पॅकेज मिळाले.

यशश्री प्रेस कॅम्पमध्ये श्रीयश एमबीएच्या सागर पाटोळे या विद्यार्थ्याची एचआर एक्झिक्युटिव्ह म्हणून निवड झाली. त्याला वार्षिक सव्वा दोन लाख रुपयांचे पॅकेज मिळाले. धूत ऑटोमोटिव्ह यामध्ये एमबीएच्या प्राप्ती गवळी या विद्यार्थिनीची निवड एचआर एक्झिक्युटिव्ह म्हणून झाली. तिला दोन लाखांचे वार्षिक पॅकेज मिळाले. श्रीयशच्या सेंट्रल प्लेसमेंटप्रमुख प्रा. अनिल पालवे म्हणाले, "आम्ही आमच्या विद्यार्थ्यांना उद्योग विश्वातील सध्याच्या तंत्रज्ञानाच्या गरजेनुसार प्रशिक्षण देत आहोत."



आमच्या शिक्षकांनी आणि प्लेसमेंट सेलने मला योग्य प्रशिक्षण दिले. ज्यामुळे माझी निवड होऊ शकली. मी श्रीयश अभियांत्रिकी महाविद्यालयाची आभारी आहे. - **दिव्या लहाने**

श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. बसवराज मंगरुळे, विश्वस्थ ऐश्वर्या मंगरुळे, मुख्याधिकारी कर्नल जॉय डॅनियल, प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील, अधिष्ठाता डॉ. पी. एम. अर्धापूरकर आणि श्रीयश एमबीएच्या संचालिका डॉ. ज्योती मुंडे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

(RCI)

**Shreeyash Pratishthan**

Polytechnic | Engineering | Pharmacy | BAMS | MBA| BCA

सकाळ

Sundy 29/12/2024

# परिसर मुलाखतीत 'श्रीयश'च्या २२ विद्यार्थ्यांची झाली निवड

**छत्रपती संभाजीनगर** : श्रीयश अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या तसेच एमबीएच्या २२ विद्यार्थ्यांची परिसर मुलाखतीत निवड झाली. श्रीयशमध्ये नुकतीच कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह झाली. यात बीजी लिन इलेक्ट्रिकल्स, एव्हर इलेक्ट्रॉनिक्स पुणे, औरंगाबाद ऑटो ॲन्सिलरी, यशश्री प्रेस कॉम्प, अजाइल टेक्नॉलॉजी सोल्यूशन्स, ग्राइंड मास्टर मशीन्स आणि इन्फिसोल एनर्जी अशा नामांकित कंपन्यांनी सहभाग घेत कौशल्य असलेल्या विद्यार्थ्यांची निवड केली. यामध्ये विद्यार्थ्यांना तीन ते पाच लाखांपर्यंत पॅकेज देण्यात आले आहे. मुलाखत प्रक्रिया बी. टेक. यांत्रिक, विद्युत, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक शाखा आणि एमबीए मार्केटिंग व एचआर शाखांसाठी आयोजित करण्यात आली होती. निवड झालेल्या २२ विद्यार्थ्यांमध्ये १४ जण अभियांत्रिकीचे तर उर्वरित आठ एमबीएच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या निवडीबद्दल श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष बसवराज मंगरुळे, विश्वस्त ऐश्वर्या मंगरुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी निवृत्त कर्नल जॉय डॅनियल, प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील, अकॅडेमिक डिन डॉ. पी. एम. अर्धापूरकर, एमबीए महाविद्यालय संचालक डॉ. ज्योती मुंडे यांनी कौतुक केले.

आधुनिक केसरी

Sunday 29/12/2024



# श्रीयशच्या विद्यार्थ्यांची कॅम्पस मुलाखतीमध्ये निवड

## औद्योगिक तयारी आणि कार्यक्षमतेची चाचपणी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** श्रीयश अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या सेंट्रल ट्रैनिंग अँड प्लेसमेंट सेलने या आठवड्यात अभियांत्रिकी आणि एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित केला. या मेळाव्यात बीजी लिन इलेक्ट्रिकल्स, एव्हर इलेक्ट्रॉनिक्स पुणे, औरंगाबाद ऑटो अँन्सिलरी, यशश्री प्रेस कॉम्प, अजाईल टेक्नॉलॉजी सोल्यूशन्स, ग्राइंड मास्टर मशीन्स आणि इन्फिसोल एनर्जी अशा नामांकित कंपन्यांनी सहभाग घेतला. कंपन्यांनी प्लेसमेंट प्रक्रियेत प्री-प्लेसमेंट सत्रे, ऑनलाईन आणि ऑफलाईन तांत्रिक चाचण्या, तसेच तांत्रिक व एचआर मुलाखती घेतल्या. या चाचण्यांद्वारे विद्यार्थ्यांची तांत्रिक कौशल्ये, सकारात्मक दृष्टीकोन, औद्योगिक तयारी आणि कार्यक्षमतेची चाचपणी करण्यात आली. ही मुलाखत प्रक्रिया बी. टेक. यांत्रिक, विद्युत, इलेक्ट्रॉनिक्स, संगणक शाखा आणि एमबीए मार्केटिंग व एचआर शाखांसाठी आयोजित करण्यात आली होती. सेंट्रल ट्रैनिंग अँड प्लेसमेंट सेल प्रमुख प्रा. अनिल पालवे म्हणाले की, आम्हाला उद्योग क्षेत्राकडून उत्तम प्रतिसाद मिळत असून, आम्ही उद्योग मानकांनुसार विद्यार्थ्यंना प्रशिक्षित करून कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी कटिबद्ध आहोत. या परिसर मुलाखतीमध्ये बावीस विद्यार्थी निवडले गेले, यामध्ये चौदा अभियांत्रिकी विद्यार्थी आणि आठ एमबीएच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. श्रीयश प्रतिष्ठानचे अध्यक्ष इंजि. बसवराज मंगरुळे, विश्वस्त ऐश्वर्या मंगरुळे, मुख्य कार्यकारी अधिकारी कर्नल जॉय डॅनियल, प्राचार्य डॉ. बी. एम. पाटील, अकॅडेमिक डीन डॉ. पी. एम. अर्धापुरकर, एमबीए महाविद्यालय संचालक डॉ. ज्योती मुंडे यांनी निवड झालेल्या यशस्वी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील विभागप्रमुख आणि प्राध्यापक वृंद ह्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करत अभिनंदन केले.

LOKMAT TIMES

**Monday 30/12/2024**



A total of 22 students were selected in the campus placement drive held recently in Shreeyash College of Engineering and Technology.

# 22 students of Shreeyash College get placements

LOKMAT NEWS NETWORK
CHHATRAPATI SAMBHAJINAGAR

The Central Training and Placement Cell (CTPC) of Shreeyash College of Engineering and Technology organised a campus placement drive recently for students from B Tech (Mechanical, Electrical, Electronics, and Computer Science branches) and MBA (Marketing and HR branches).

Prominent companies such as BG Lin Electricals, Ever Electronics Pune, Aurangabad Auto Ancillary, Yashshree Press Comp, Agile Technology Solutions, Grind Master Machines, and Infisol Energy participated in this recruitment event.

The placement process included pre-placement sessions, online and offline technical tests, technical and HR interview rounds. A total of 22 students were selected, including 14 Engineering students and 8 MBA students, in the campus recruitment.

Chairman of Shreeyash Pratishthan Baswaraj Mangrule, trustee Aishwarya Mangrule, chief executive officer Col Joy Daniel, principal Dr B M Patil, head of the CTPC Anil Palve and heads of Departments wished the successful candidates.